# परभणी शहर महानगरपालिका, परभणी

फोन नं. 02452-223232 ई-मेल- pcmcparbhani@gmail.com


जा.क्र. कावि-३/आस्था/१०४/२०१८ दिनांक/ ११/१/२०१८

# जाहीर सूचना

परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत अग्नीशमन विभागातील विविध तांत्रिक कामे करण्याकरीता खालील पदे एकत्रीत वेतनावर /मानधनावर सहा महिन्याचे करार पद्धतीने भरण्यासाठी जाहिररित्या अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | भरावयाची पदे | अर्हता/ वयोमर्यादा | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | फायरमन | १० | वयोमर्यादा १८ ते ३० वर्ष (जाहिरातीच्या तारखेस असणारे वय)<br>१. माध्यमीक शालांत परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक<br>२. राज्य शासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा किमान ६ महिन्यांचा अग्नीशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.<br>३. मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४. MS-CIT परीक्षा उतीर्ण असावा.<br>शारीरीक पात्रता<br>उंची- १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>छाती- किमान ८१ से.मी. फुगवून ५ से.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>वजन- किमान ५० किलो<br>दृष्टी- चांगली.<br>या पात्रता बंधनकारक आहेत अन्यथा थेट अपात्र चाचणीच्या कोणत्याही स्तरावर व निवडीनंतरही करण्यात येईल. | रु.८०००/- दरमहा |

## अटी व शर्ती

१. वयोमर्यादा : भारतीय नागरिक, महाराष्ट्र राज्याचा अधिवास यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२. सदर नियुक्ती प्रत्येक ०६ महिन्यांकरीता राहील. तसेच म.न.पा. अकृतीबंधातील रिक्त पदे सरळसेवा भरतीने किंवा ईतर पद्धतीने भरल्यास तसेच, संवर्गातील कर्मचारी बदली होयून आल्यास सदर एकत्रीत वेतना वरील सेवा संपुष्टात होईल.
३. काम असमाधानकारक असल्यास कामावरुन तात्काळ कमीकरण्याचे आदेश देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.
४. कार्यालय आदेशाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.
५. उपरोक्त पदांवर नियुक्ती झाल्यानंतर आपणास परभणी शहरात रहिवास करणे आवश्यक आहे, परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.
६. सदर पदावर नियुक्ती नंतर मानधना व्यतीरिक्त काणेतेही आर्थिक लाभ देण्यात येणार नाहीत, पदाचे कायम हक्क प्राप्त होणार नाहीत. तसेच कायम भरती मध्ये इतरांपेक्षावेगळी सवलत मिळणार नाही.
७. आपण नियुक्ती नंतर कायम करण्याबाबत प्रशासनाकडे महापालिका सदस्य, समिती, सभा अथवा मा. न्यायालयाकडे अर्ज केल्यास तात्काळ कमी करण्यात येऊन आपण शिस्तभंगाच्या कार्यवाही पात्र ठराल.
८. स्वत:हून नौकरी सोडावयाची असल्यास त्याबाबत एक महिना आगोदर महानगरपालिका कार्यालयास लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे.
९. यापूर्वी भरती प्रक्रियेत अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारास पुन्हा अर्ज करता येणार नाही.
१०. सदर भरतीप्रक्रिया शासनाच्या सध्याच्या व नंतर येणाऱ्या शासन निर्देशाच्या अधिन राहून सदर भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
११. उपरोक्त पदावर अर्जदाराने आपला अर्ज व शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्र उपायुक्त महानगरपालिका परभणी यांच्याकडे दि. २५.०१.२०१८ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करावेत. त्यानंतरचे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.
१२. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र/अपात्र उमेदवारांची यादी दि. २९/०१/२०१८ रोजी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यात येईल.याबाबत आक्षेप दाखल करावयाचे असल्यास याच दिवशी कार्यालयीन वेळेत आस्थापना विभागाकडे लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा.
१३. तसेच पात्र उमेदवारांची दिनांक ३१.०१.२०१८ रोजी स. ७.०० वा. स्थळ परभणी शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय परभणी येथे शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. यात किमान ६०% गुण आवश्यक आहेत.

**अ) १५ फुट दोर चढणे (१५ गुण)**

| अंतर | पूर्ण | ३/४ | १/२ | १/४ |
|---|---|---|---|---|
| गुण | १५ | १२ | ०८ | ०४ |

**ब) १०० मीटर अंतर ५० कि.लो. ग्रॅम मानवी प्रतिकृती खांद्यावर घेऊन धावणे (१५ गुण)**

| वेळ सेकंद | २० किंवा कमी | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३० पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | १५ | १४ | १३ | १२ | ११ | १० | ०९ | ०८ | ०७ | ०६ | ०५ | ० |

**क) ३५ फुट शिडी चढणे व उतरणे (१५ गुण)**

| वेळ सेकंद | २० किंवा कमी | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३० पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | १५ | १४ | १३ | १२ | ११ | १० | ०९ | ०८ | ०७ | ०६ | ०५ | ० |

**ड) २५ मीटर पोहणे (१० गुण)**

| वेळ सेकंद | ३५ किंवा कमी | ३६-४० | ४१-४५ | ४६-५० | ५१-५५ | ५५ पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|---|---|
| गुण | १० | ०८ | ०६ | ०४ | २ | ० |

**इ२) उंची सापेक्ष देण्यात येणारे गुण (०५ गुण)**

| से.मी. | १३५-१६७.९ | १६८-१७०.९ | १७१-१७३.९ | १७४-१७६.९ | १७७-१७९.९ | १८० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| गुण | ० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |

१४. शैक्षणिक व शारीरीक क्षमता धारण करणाऱ्या उमेदवारांची दिनांक ०१/०२/२०१८ रोजी मुलाखत घेण्यात येईल. यासाठी जास्तीत जास्त १ : ३ या प्रमाणात उमेदवार मुलाखतीसाठी पात्र करण्यात येतील. (गुण २०)
१५. मुलाखतीमध्ये पात्र झालेल्या अर्जदारास त्यांनी दिलेल्या पत्यावर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.
१६. नियुक्ती प्रक्रिये बाबत मा. आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील.
१७. वरील सर्व अटि व शर्तींच्या अनुषंगाने रु. १००/- चे बॉण्ड पेपरवर शपथपत्र लिहून देणे बंधनकारक असून, नियुक्त उमेदवाराने तात्काळ ०३ दिवसांचे आत रुजू होणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येतील.
१८. PSU/ शासकीय अनुभवास प्राधान्य.
१९. PSU/ शासकीय नौकरी करत असणाऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र विभाग प्रमुखांकडून आणणे आवश्यक आहे.
२०. पोलीस विभागाची NOC नेमणुकीच्या वेळी आवश्यक आहे.
२१. चाचण्यांसाठी येताना नजीकच्या काळातील शासनमान्य ओळखपत्र मूळ स्वरुपात सोबत आणावे. (E आधारकार्ड, राशनकार्ड चालणार नाही)
२२. गैरवर्तन करणाऱ्यास तात्काळ संपूर्ण भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
२३. वरील सर्व प्रक्रियेकरीता उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

स्वाक्षरीत/-
**आयुक्त**
परभणी शहर महानगरपालिका, परभणी